मा. श्री. अशोकभाऊ जैन सा.

Tiwari Saheb/ ~~MANISH~~

# ॲग्रोवन

ध्यास... कृषी व ग्रामविकासाचा

स्पॉट रिपोर्ट

## शेतमाल लुटारूंना चपराक



शेतीतिर्थ

## जळगावात साकारलं 'हिरवं सपानं'



# 'FPO'मुळे मिळाले बळ



शेतमाल विक्रीसाठी शेतकरी संघटित, कंपनी स्थापली



कंपनी स्थापनेतून वाघोलीतील शेतकऱ्यात समृद्धी



सेंद्रिय शेतमालास हक्काची बाजारपेठ निर्माण



उच्चशिक्षित तरुणांनी शेतकरी कंपनी उभारली



गटशेतीचे मधूर फळ कंपनी स्थापनेसाठी मिळाले बळ

युकेत उभारला चार मजली 'व्हर्टीकल फार्म' | अमेरिकेत सांघिकतेमुळे शेतमाल उत्पादक कंपन्या सक्षम

अंकासाठी संपर्क : किरण पाटील ९७६३९८८३११, प्रकाश पाटील ९०२८८५७८९६


ॲग्रोवर्ल्ड
सप्टेंबर २०१६

चिंतामण पाटील,
जळगाव

# जळगावात साकारलं 'हिरवं सपानं'

शेतकऱ्यांसाठी काही क्षेत्र अशीही असतात, जी प्रेरणा देतात, मार्गदर्शन करतात. यामुळचं ही क्षेत्र शेतकऱ्यांसाठी शेतीतिर्थ बनतात. यापैकीच जळगावातील 'जैन' उद्योग समुहाने विकसित केलेलं क्षेत्र आहे. जैन हिल्स, व्हॅली, सोलर प्लान्ट, टाकरखेडे येथील संशोधन व विकास प्रकल्प, टिश्यू कल्चर नर्सरी, कांताई बंधारा ही सर्व ठिकाण आवर्जुन पाहण्यासारखी आहे. अभ्यासू शेतकऱ्यांसाठी शिकण्यासारखी आहेत. योग्य नियोजन करून किमान दोन ते तीन दिवस हे सर्व क्षेत्र बघण्यासाठी लागतात. या क्षेत्राचं 'ॲग्रोवर्ल्ड'च्या वाचकांसाठी खास दर्शन...





## जैन हिल्स, व्हॅलीवर काय बघाल?

- निसर्गरम्य २ हजार १०० एकरचा परिसर, जो संपूर्ण ठिबक सिंचनाने पिंजलाय.
- संशोधन आणि विकास प्रकल्पाची अद्ययावत प्रयोगशाळा, टाकरखेडा येथे टिश्यू कल्चर नर्सरी.
- भव्य फळप्रक्रिया आणि फळांच्या टाकावू भागापासून वीज निर्मितीचा अनोखा प्रकल्प.
- सोलर वीज निर्मिती प्रकल्प, निसर्ग रम्य, फळबागांच्या सान्निध्यातील भव्य प्रकल्प.
- शेतकऱ्यांना हमीने उत्पन्न देणारा कांदा निर्जलीकरण प्रकल्प.
- भाऊंचा धक्का : देखणं ठिकाण, रस्त्यांच्या दुतर्फा दाट झाडी नि स्वच्छता!
- गांधीतीर्थ : गांधीजींचा जीवन परिचय, त्यांचा विचार सोप्या आणि आधुनिक ऑडिओ, व्हिज्युअल (दृकश्राव्य) माध्यमाद्वारे.

जळगाव म्हणजे रखरखीत ऊन.. असं चित्र आपल्या डोळ्यासमोरं येतं. पण, हे चित्र आता काही अंशी तरी बदललं आहे. जळगाव वासियांना एका भुमिपुत्रानं हिरवं स्वप्न दाखवलं आहे. हे हिरवं स्वप त्याने फक्त पाहिलं नाही तर, शेतीतही साकारलं... हे स्वप्न साकारलं राजस्थानच्या लढाऊ मातीतून संस्कार घेऊन जन्माला आलेल्या भवरलालजीं जैन यांनी... असं काय आहे भवरलालजींनी साकारलेल्या 'जैन' उद्योग समुहाच्या क्षेत्रात? चला जाऊया... शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शक असणाऱ्या या शेतीतिर्थाच्या भेटीला!

'जैन' उद्योग समुहाच्या जनसंपर्क विभागात कार्यरत असलेले अनिल शिंदे गाडी घेऊन माझ्यासमोर हजर झाले. जैन उद्योग समुहाच्या विविध उप्रकमांना भेट द्यायची म्हणजे नियोजनपूर्वक निघावे लागते. आम्ही सुरवात केली टाकरखेडा येथील संशोधन आणि विकास प्रकल्पापासून. राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ वर जळगावपासून ७ किलोमीटर अंतरावर गिरणा काठावर बांभोरी गाव लागतं. तेथून दक्षिणेला महामार्गापासून ६ ते ७ किलोमीटर अंतरावर टाकरखेडे शिवारात हा प्रकल्प. प्रकल्पाकडे जातांना उजव्या हाताला उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ ज्या टेकड्यांवर उभं राहिलय त्या टेकड्या लागतात. गिरणा नदीच्या काठाकाठानेच टाकरखेड्याकडे जाणाऱ्या रस्त्यानं जावं लागतं. संशोधन प्रकल्पाच्या प्रवेशद्वाराजवळ पोचलो. आत गेल्याबरोबर अनिल शिंदे यांनी येण्याचा उद्देश, आत किती वेळ थांबणार आदीची नोंद केली. तेथील फ्युचर प्लॅन, टिश्यू कल्चर, संशोधन व विकास प्रकल्प बघायचा असल्याने आमच्या सोबत आता प्रकल्पातील कृषी जनसंपर्काची जबाबदारी सांभाळणारे श्री भामरे होते. प्रवेश करता क्षणी डाव्या हाताला हिरव्यागार लॉन्सला खेटून 'जलव्यवस्थापन धोरण/निती' असं लिहिलेला एक माहिती फलक आपलं लक्ष वेधून घेतो. पाण्याच्या वापराबाबतचं या उद्योगाचं स्वतःचं धोरण हा माहितीफलक स्पष्ट करत होता.



'जैन इरिगेशन'चे संस्थापक अध्यक्ष स्व. भवरलालजी जैन (मध्यभागी) यांच्या समवेत डावीकडून अध्यक्ष अशोक जैन, व्यवस्थापकीय संचालक अनिल जैन, सहव्यवस्थापकीय संचालक अतुल जैन व अजित जैन.

**भविष्यवेधी मातीविना शेती**

शेतीक्षेत्रात नवनवीन संशोधने हा स्व.भंवरलालजी यांचा जिव्हाळ्याचा विषय. असे संशोधन त्यांनी आपल्या उद्योग समुहाच्या माध्यमातूनही सुरू केले. या संशोधनाची प्रकल्पाची माहिती आता करून घ्यायची होती. महाराष्ट्रात दरडोई जमीन धारणा क्षेत्र घटत आहे. आता २ ते ५ एकरच्या दरम्यान शेती असलेलेच शेतकरी जास्त आढळतात. पुढील काळात ते प्रमाण कदाचित आणखी कमी कमी होत जाणार असे दिसते. असे असताना शेती करायला जमीन तोकडी पडणारच ना? माती ही पीक उत्पादनासाठी माध्यम आहे. ह्या माध्यमाशिवाय पीकं घेता येऊ शकतं का? याचा अभ्यास जगात केला जातोय, त्यातलंच एक संशोधन येथे चाललं आहे. येथे विनामातीच्या शेतीचे वेगवेगळे प्रयोग सुरू आहेत. अलिकडे आपण हायड्रोपोनिक तंत्राबाबत बरच काही वाचतो व पाहतो आहोत. अलिकडच्या काही वर्षात विकसित झालेलं हे तंत्रज्ञान. येथे त्याच्या पुढे जाऊन संशोधन सुरू आहे. वेगवेगळ्या आकाराच्या पीव्हीसी (नेहमीपेक्षा जास्त जाडी असलेले) पाईपचा वापर यासाठी केला आहे. उपलब्ध जागेचा अधिकाधिक उपयोग करून घेण्यासाठी हे पाईप पिरॅमिड पद्धतीने ठेवले. त्यासाठी ४ ते ५ पद्धती वापरात आणल्या आहेत. त्यात जे अधिक सोयीचे असेल ते वापरण्यायोग्य करण्यावर येथे संशोधन सुरू आहे.

पाणी मुबलक असो अगर त्याची कमतरता. ते मुल्यवान असून त्याच्या कमीत कमी वापरातून कशी पिके घेतली जाऊ शकतात त्याचे प्रयोग येथे सुरू आहेत. यात सायलेस मिडिया वापरून आले, हळद यासारखी पिके, भाजीपाल्यातील मेथी, कोबी आदी पिके घेता येऊ शकतात. फक्त पाण्याच्या काही सेकंदाचा फवारा मुळ्यांना देऊनही भाजीपाला घेतला जातो. एप्रिल-मे महिन्यात लावलेलं कोबी पीकं फुलधारणेच्या अवस्थेत दिसलं. पॉलीहाऊसमध्ये हे सर्व प्रयोग होत आहेत.

शहरांमध्ये जिथे परसबागे थाटणे अशक्य, तिथे काही हौसी मंडळी मग कल्पकतेने टेरेस गार्डन उभे करतात. त्यांच्या या कल्पकतेला येथील प्रकल्पात चालना मिळते. येथे बिनमातीची, कमी पाण्याची व कमीत कमी जागेत करता येण्याजोगी आधुनिक परसबाग तयार केली आहे. सध्या याबाबतीत प्रयोग सुरू असून यशस्वी झाल्यानंतर मागणीनुसार स्ट्रक्चर पुरविले जाणार आहे. येथील फॉडर प्लॅन, अर्बन किचन गार्डन, हायड्रोपोनिक पिरॅमिड स्टाईल, सायलेस मिडिया, व्हर्टिकल फार्मिंग या भविष्यवेधी प्रकल्पावर सखोल संशोधन सुरू आहे. याच परिसरात ठिकठिकाणी सोलर पॅनल उभारले आहेत. सोलर पॅनल उभारण्यात आलेली ही जागा पुन्हा भाजीपाल्याच्या शेतीसाठी वापरली आहे. परिसरातील पाण्याची काही प्रमाणात गरज पूर्ण व्हावी म्हणून येथे एक तलावाची निर्मिती केली असून त्यावरही तरगंते सोलर पॅनल दिसलं. सोलर वॉटर हिटरपासून

झालेली सुरवात आज सोलर पंपापर्यंत येऊन पोहोचली आहे. या प्रकल्पावरची संपूर्ण वीज सोलर सिस्टिमची आहे. येथे पाणी पुरवठ्यासाठीचे सर्व पंप सौर उर्जेवर चालणारे आहेत.

### टिश्यू कल्चर नर्सरी


संशोधन प्रकल्पातील टिश्यू कल्चर नर्सरीमध्ये मध्ये केळी, डाळिंब आदी रोपांचा जन्म आणि बालपणाचे संगोपन पाहण्यासारखे आहे. कंपनीने केळीचे ङ्गग्रॅन्डनाइनफ हे वाण शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिले. याची रोपे समान उंचीची, उच्चदर्जाची असतात. प्रयोगशाळेतून केळीच्या संशोधित दर्जेदार उती हवाबंद बाटलीत बंद केल्या जातात. अशी बाटलीबंद टिश्यू रोपे टाकरखेडे येथील प्रायमरी हार्डनिंग सेंटरकडे येतात. ती रोपे पाणी आणि हवेच्या प्रेशरने स्वच्छ करून ट्रेमध्ये रोवली जातात. रोवणी करतानांच लहान, मोठ्या रोपांची छाटणी केली जाते. ही छाटणी करण्यात प्रकल्पाच्या आसपासच्या गावातील मजूर महिला तरबेज बनल्या आहेत. या मजूर महिला शिस्तबद्धपणे हे काम करत असल्याची माहिती या विभागाच्या प्रमुख कल्याणी मॅडम यांनी करून दिली. ट्रेमध्ये रोपे लावतांनाचा त्यांचा उत्साह पाहण्यासारखा होता. कामातून मिळणारा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होता. येथून ही रोपे सेकंडरी हार्डनिंग विभागात पाठवली जातात. ह्या रोपांची शेतकऱ्यांना लागवडीसाठी देण्याजोगी रोपे होईपर्यंत पॉलीहाऊसमध्ये वेगवेगळ्या तापमानात वाढ होऊ दिली जाते. अखेरच्या टप्प्यात खुल्या वातावरणात ती ठेवली जातात. रोपे निरोगी कशी राहतील याची काळजी घेतली जाते. केळी व डाळिंबासोबतच आता पेरुची टिश्यू कल्चर रोपे येथे तयार करण्यात येतात. सुमारे दोनशे एकर क्षेत्रावर हे काम सुरू आहे. रोपांची एका उतीपासून लागवड योग्य रोपापर्यंतची वाटचाल पाहण्यासारखी होती.

### 'कांताई' बंधाऱ्याला भेट

संशोधन आणि विकास विभागाचा निरोप घेऊन चढ-उताराचा रस्ता पार करीत आमची गाडी मार्गस्थ झाली. प्रवासात 'जैन' उद्योग समुहाबाबतची विविध माहिती अनिल शिंदे देत होते. त्यातलाच एक महत्वाचा टप्पा म्हणजे 'कांताई बंधारा' टाकरखेड्यापासून ५ किलोमीटर अंतरावर हा बंधारा आहे. वेडीवाकडी वळणे घेत आम्ही बंधाऱ्यावर येऊन पोहोचलो. सरत्या दुष्काळी वर्षाच्या शेवटपर्यंत कांताई बंधाऱ्यात पाणीसाठा असल्याचं समजलं. यामुळंच नागझिरी, खेडी, कढोली, टाकरखेडे, धानोरा परिसरातील कोरडवाहू शेतकऱ्यांसाठी हा बंधारा वरदान ठरला. गिरणेच्या दोन्ही काठावर सुपीक, गाळाची व पोयटा मातीची जमीन आढळते. पाण्याचा चांगला निचरा होणाऱ्या या जमिनीत पावसाळा संपला की, सिंचनाची दुसरी सोयच नाही. या भागातील गिरणेचं खडकाळ पात्र पाहता पाणी मुरणे शक्यच नाही. पण, येथे एखादा बांध बांधल्यास येथील कोरडवाहू शेतीचं भविष्य बदलू शकतो हे अनेकांच्या ध्यानी होतं. शासनाच्या जलसंपदा विभागालाही कळतं होतं. मात्र, यासाठी कोणीच पुढाकार घ्यायला तयार नव्हतं. येथे बंधारा बांधायचा हा निश्चय भवरलालजी जैन यांनी केला. तापी पाटबंधारे महामंडळाशी करार करून पब्लीक प्रायव्हेट पार्टनरशिप तत्त्वानुसार हा बंधारा बांधायचे ठरले. बांधकामाच्या खर्चाच्या बदल्यात साठलेल्या पाण्याच्या ५० टक्के वाटा 'जैन उद्योग समुहाला' मिळाला. हा बंधारा झाला आणि गिरणेच्या काठावरील शेतकऱ्यांची शेती बारमाही बागायती झाली. बंधाऱ्याचे काम फक्त ९ महिने आणि ११ दिवसात पूर्ण झाले. यासाठी ७ कोटी ८५ लाख ८१ हजार रुपये खर्च लागला. बंधाऱ्यात पाणी साठवण्याची क्षमता १७९ कोटी लिटर इतकी आहे. ह्या बंधाऱ्याने नुसते पाणीच अडले नाही तर दोन्ही काठांना जोडणारा पुल देखील तयार झाला. निसर्ग सहल काढायला एक पर्यटन स्थळ झालं. तिथून हलण्याचा मोह आम्हालाही आवरतं नव्हता परंतू, पुढचा प्रवास 'जैन हिल्स'कडे असल्यानं 'कांताई' जलाशय डोळ्यात साठवून हिल्सच्या दिशेने निघालो.

### टेकडीवरील निसर्ग वैभव

जळगावहून शिरसोलीमार्गे पाचोरा जाणारा रस्ता मेहरुण तलावला खेटून जातो. अनेक वळणे घेत लहानमोठ्या टेकड्यांमधून पुढे सरकतो. वाटेवर अनेक हिरव्या टेकड्या दिसतात. यात गर्द झाडीने व्यापलेला एक टापू दृष्टिस पडतो तेव्हा हे नयनरम्य ठिकाण आहे तरी काय? हा प्रश्न वाटसरुंच्या मनात निर्माण होतो. इतर टेकड्या उघड्या बोडक्या असताना इथेच कसं काय नंदनवन बहरलं? या हिल्सवर आल्यावर या प्रश्नाची उत्तरे आपल्याला मिळू लागतात. शिरसोली परिसरातील टेकड्या विकसित करण्याचा संकल्प भंवरलालजींनी केला. सुरवातीला शासन दप्तरी पडीक, नापीक जमीन अशी नोंद असलेला सुमारे २०७ हेक्टरचा हा परिसर. बोरी, बाभळींच्या झुडुपांचं येथं साम्राज्य, मातीपेक्षा दगड-धोंडेच अधिक. परंतू, हे चित्र बदलण्याचं ठरवलं. उजाड



स्व. भवरलालजी जैन (मोठे भाऊ) यांच्या अथक प्रयत्नांमुळे 'जैन इरिगेशन'ला सातासमुद्रापार मजल मारता आली.

टेकड्यांवर जमिनीची धूप थांबवून पाणी अडवणं आवश्यक होतं. टेकड्यांच्या उतारावर सीसीटीची नक्षी (उताराला आडवे चर खणले) उतरवली. धावत्या पाण्याला चालायला शिकवलं, चालणाऱ्या पाण्याला थांबायला शिकवलं आणि थांबणाऱ्या पाण्याला जमिनीला प्यायला शिकवलं. पाणी उतारावरून वाहून जात नव्हतं तर, ते डोंगर पीत होता आणि तळाला पोहोचवत होता. टेकड्यांच्या तळाशी हे पाणी साठवण्यासाठी पाझर तलाव बांधण्यात आले. ह्या तलावांमुळे जमिनीतील पाण्याच्या पातळीत आपोआप वाढ झाली. टेकड्यांच्या पायथ्याशी आलेलं हेचं पाणी मग ठिबक सिंचन संच्यातून डोंगरभर फिरु लागलं. नापीक जमिनीचा शाप भाळी वाहणारे हे डोंगर हिरवे होऊ लागले. मग बोरी, बाभळींच्या सोबतीला निंब, साग, चिंच वाढू लागले. काही ठिकाणी गाळ टाकून तिथे आंबा, डाळिंबाची कलमे रुजली. आणि मग पाहता पाहता ह्या उजाड टेकड्यांचे हिरवंगारं नंदनवन झालं. या देखण्या, हिरव्यागार परिसरात पाय ठेवल्याबरोबर शिस्त आणि स्वच्छतेचे दर्शन जागोजागी घडतं. दुपारचा एक वाजला होता. पुढच्या भटकंती आधी पोटपुजा करावी असा विचार अनिल शिंदे यांनी मांडला. 'राजा भोज' भोजनालयाजवळ आम्ही आलो. सात्विक, रुचकर भोजनाचा आस्वाद घेऊन आम्ही मपरिश्रमम ला भेट द्यायला निघालो.

**परिश्रमाचा गौरव झाला**

परिश्रम आणि गौरव असा विभाग असून येथे 'जैन' उद्योग समुहात उत्पादित होणाऱ्या सर्व उत्पादनांची माहिती मिळते. गुणवत्तापूर्ण उत्पादनांमुळे कंपनीच्या झालेल्या गौरवाच्या खुणा येथे पाहायला मिळतात. जिज्ञासेचे समाधान करायला परिश्रम विभागात सुबोध सराफ, चिन्मय जोशी, गिरीश कुळकर्णी व धिरज खडके यांची टिम असते. यावेळी आमच्यासोबत चिन्मय जोशी व सुबोध भारंबे होते. कंपनीने ज्या पीव्हीसी पाईपापासून उद्योगाची सुरवात केली तेव्हांपासून ते आज फळप्रक्रिया उद्योगापर्यंतची माहिती येथे मिळते. कंपनी पाईप व सिंचनाशी संबंधित ८ हजार प्रकारचे स्पेअर पार्ट बनवते. यात ६ एमएम पासून ते ३२ एमएम पर्यंत लॅटरल नळ्या व २ हजार एमएम पर्यंतचे पाईप तयार करते. 'परिश्रम' इमारतीच्या वरच्या मजल्यावर जैन उद्योग समुहाला मिळालेल्या पुरस्कार, सन्मानाचे दालन आहे. आजवर तीनशेपेक्षा जास्त पुरस्कार मिळाले असून त्यातील उल्लेखनीय पुरस्कार म्हणजे भंवरलालजींना मिळालेला भारत सरकारचा 'पद्मश्री' व दुसरा १९९७ साली मिळालेला 'क्रॉफर्ड अॅन्ड रिड मेमोरियल अॅवार्ड' इरिगेशन असोशिएशन ऑफ अमेरिकातर्फे हा पुरस्कार अमेरिकेच्या बाहेर सिंचनाच्या क्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्या कंपनीला दिला जातो.


उद्योगासोबतच सामाजिक क्षेत्रातील योगदानाबद्दल फॉर्च्यून मॅगेझीनने भंवरलालजींचा 'फॉर्च्यून ५१' या पुरस्काराने सन्मान केला आहे.

**केळी पिकातील संशोधन**

केळी पिकांचं संशोधन आणि विकास हे जैन उद्योग समुहाचं वैशिष्ट्य. आज केळी लागवड, काढणी व मार्केटिंगच्या प्रक्रियेचा ज्या गतीने शेतकऱ्यांनी अंगिकार केलाय त्यामागे येथल्या केळी संशोधन व विकास विभागाचे मोठे योगदान आहे. यासाठी कष्ट उपसणारे डॉ. के.बी. पाटील यांची या विभागात भेट झाल्यास तो सुवर्णयोग समजावा. केळीच्या बाबतीतले ते तज्ज्ञ. त्यांच्याशी झालेल्या भेटीत त्यांनी टिश्यू कल्चरमुळे केळी पिकाच्या उत्पादनाचा कालावधी कसा कमी झाला इथपासून ते निर्यातयोग्य केळीबाबतची त्यांनी माहिती दिली. कांदा निर्जलीकरण, उती संवर्धन या संबंधित सर्व संशोधनांच्या अद्ययावत प्रयोगशाळेत आम्ही प्रवेश करीत होतो. प्रसन्न व्यक्तिमत्वाचे धनी श्रीपाद जोशी आता माहिती देण्यासाठी आमच्यासोबत होते. आपली उत्पादने सर्वार्थाने गुणवत्तापूर्ण होण्यासाठी जागतिक पातळीवरची ही प्रयोगशाळा असल्याचं त्यांनी सांगितले. उच्चदर्जा गाठण्यासाठी कंपनी विविध प्रयोग करीत राहते. ग्राहकांना जे उत्पादन आपण पुरविणार आहोत ते विषमुक्त असल्याची खात्री येथे केली जाते. त्यासाठी उत्पादन घेतांना शेतकऱ्यांनी कोणती प्रतिबंधित औषधी वापरु नयेत यांची माहिती दिली जाते. शिवाय शेतकऱ्यांना कमी शुल्क आकारुन माती व पाण्याचे परिक्षणही करून देण्यात येते.

**भव्य सौरउर्जा प्रकल्प**

आता 'जैन व्हॅली'कडे आम्ही मोर्चा वळवला. आमच्या गाडीचे चालक तायडे हे देखील व्हॅलीतील प्रकल्पांची बारीकसारीक माहिती सांगत होते. सालगड्यांबाबत चर्चा करता करता आम्ही सौर प्रकल्पावर येऊन पोहोचलो. येथे माहिती देण्यासाठी संजय कोचर आमच्यासोबत होते. जवळपास ४५ एकर परिसरात विस्तारलेल्या या सोलर फोटोव्होल्टिक पॉवर प्लान्टमध्ये ८.५ मेगावॅट इतकी वीज एका वर्षात तयार होते. ७.५ मेगावॅट फिक्स स्ट्रक्चरमधून तर १ मेगावॅट ट्रॅकर स्ट्रक्चरमधून बनते. ट्रॅकर स्ट्रक्चरचे युनिट सूर्य ज्या



सौर उर्जेवर चालणारा पंप

दिशेला असेल त्या दिशेला आपोआप वळतो. यातील काही ट्रॅकर पूर्व-पश्चिम तर काही पूर्व-पश्चिम प्रमाणेच दक्षिणायन व उत्तरायणात देखील वळतात. या तंत्रज्ञानामुळे फिक्स स्ट्रक्चरपेक्षा ट्रॅकरमध्ये ३० टक्के जादा वीज तयार होते. प्रकल्प उभारणीला ११ नोव्हेंबर २०११ मध्ये प्रारंभ झाला. याचे उद्घाटन भंवरलालजींच्या वाढदिवशी म्हणजे १२ डिसेंबर २०१२ रोजी करण्यात आले. येथे वापरण्यात येणाऱ्या साहित्यात उभारणीसाठीचे ॲलोमिनियम (जर्मनी) साहित्य सोडले तर इतर सर्व साहित्य कंपनीने स्वतः तयार केले आहे. येथे तयारी होणारी संपूर्ण वीज जळगाव एमआयडीसीला दिली जाते. तलावांमध्ये तरंगते सोलर पॅनल लावून वीज तयार करण्याची अफलातून शक्कल येथे लढविण्यात आली आहे. पाण्यात तरंगणारा सौर प्रकल्प लक्षवेधी आहे. जमिनीवरील प्रकल्पाच्या तुलतेत पाण्यावरच्या प्रकल्पात १५ टक्के जादा वीज तयार होते. एकुण ४५ एकर परिसरात विस्तारलेल्या या प्रकल्पाच्या उभारणीला १३० कोटी रुपये खर्च आला असून येत्या काळात त्याचा आणखी विस्तार होणार आहे. सध्या ८.५ मेगावॅट वीज एका वर्षाला तयार होते. त्यात वाढ होणार असून आणखी १० मेगावॅटचा प्रकल्प तयार करण्यात येणार आहे. स्वच्छ, पर्यावरण रक्षण करणारा वीज निर्मिती प्रकल्प बघून डोळे दिपून जातात.

**प्रक्रिया उद्योगाची भरारी**

कांदा निर्जलीकरण प्रकल्पात आम्ही पोचलो. कोल्डस्टोरेजमधून पांढऱ्या कांद्यांच्या गोण्या रिसिव्हिंग विभागाच्या बाहेर रचून ठेवण्यात आल्या होत्या. तिथून कांदा सॉर्टिंग विभागातून पुढे यंत्राच्या सहाय्यानेच सरकविण्यात येत होता. प्रकल्पाची माहिती के.एस. महाजन देत होते. सॉर्टिंग केलेला कांदा वेगवेगळ्या पद्धतीने स्वच्छ करण्यात येतो. पाण्याने धुऊन त्याचा वरचा पापुद्रा काढून टाकण्यात येतो. पूर्ण स्वच्छ कांदा तुकडे करणाऱ्या यंत्रापर्यंत पाठविला जातो. मागणीनुसार लहानमोठे तुकडे करुन ते ड्रायरमध्ये सुकविण्यासाठी पाठविले

## फळांच्या टाकाऊ भागातून विजनिर्मिती

फळप्रक्रिया उद्योगातील वेस्टेज (टाकावू) पासून वीजनिर्मिती प्रकल्पाची उभारणी केली आहे. या प्रकल्पातून १.७ मेगावॅट इतकी वीज तयार होते. जैन व्हॅलीत लागणाऱ्या एकूण विजेपैकी एकतृतियांश वीज या प्रकल्पात तयार होते. आंब्याची साल, कोय तसेच इतर फळांचा टाकावू भाग त्यासाठी वापरला जातो. त्यावर विविध प्रक्रिया करून, विशिष्ट तापमानात ते काही काळ ठेवून त्यापासून तयार होणारा गॅस एका ठिकाणी सोडला जातो. येथे मासेमारीच्या जाळ्या सोडल्या जातात त्यात थायोबॅसिलस बॅक्टेरिया असतात. अशा जाळी असलेल्या पाईपातून तयार झालेला गॅस, ज्यात हायड्रोजन सल्फाइड असतो. बॅक्टेरिया हा हायड्रोजन सल्फाइड शोषून त्याचे रुपांतर सल्फरमध्ये करतात. त्याचवेळी मिथेन गॅस वेगळा तयार होतो. तो गॅस बायोगॅस बकेटमध्ये गोळा करून तो तेथून दूरवरच्या इंजिनपर्यंत पाठवला जाऊन तेथे वीज तयार होते. पुन्हा उरलेल्या वेस्ट मटेरियलमध्ये बॅक्टेरियांनी मिथेनपासून वेगळा केलेला सल्फर वापरून गुणवत्तापूर्ण जैविक खत तयार होते. फळाचा एक कण देखील वाया जाणार नाही याची काळजी या प्रकल्पात घेतली आहे. या प्रकल्पाची संपूर्ण माहिती विकास पाटील यांनी सांगितली.

## 'जैन'चे भूषण प्लॅस्टिक पार्क

'जैन' उद्योगासमुहाची सुरवात पीव्हीसी पाईप उत्पादनाने सुरू झाली. सुमारे ४ हजार ५०० सहकाऱ्यांचे हात ज्या ठिकाणी राबतात तो हा जगातला एक भव्य प्रकल्प आहे. सुमारे १९० एकर परिसरात हा प्रकल्प विस्तारलेला असून २० एमएम ते ६६० एमएम पर्यंतचे पाईप येथे तयार होतात. पीव्हीसी व एचडीपीव्ही पाईपांची मालिकाच येथे पहायला मिळते. पॉली व्हिनाइल क्लोराइड या पेट्रोलियम पदार्थापासून ह्या पाईपांची निर्मिती होते. येथे कर्मचारी म्हणून नाही तर, प्रत्येकजण सहकारी आहे. दिवसभर ज्या-ज्या सहकाऱ्यांशी संवाद साधला त्या प्रत्येकाच्या तोंडी कर्मचारी हा शब्दच नव्हता.

अजून बरंच पाहण्यासारखं होतं. परंतू, आज परतुया, परत कधीतरी येऊच असा इरादा मनाशी करून परतीच्या प्रवासाला निघालो. मागे वळून पुन्हा वृक्षराजीला डोळेभरुन पाहून घेतलं. एक गोष्ट सतत जाणवत होती, तिथेच कुठेतरी तो भुमिपुत्र उभा आहे आणि सगळ्यांना सांगतो आहे, 'तुम्हीच तुमच्या कामाचे मालक आहात, तुमची वागणूक मालकासारखी हवी.' सकाळपासून जैन उद्योग समुहाच्या ज्या ज्या सहकाऱ्याला भेटलो त्या प्रत्येकाची देहबोली हेचं सांगत होती. एका अनोख्या कार्यसंस्कृतीच्या तिर्थाचं दर्शन घेऊन मी प्रसन्न चित्ताने परतत होतो..!



'जैन' उद्योगसमुहात उत्पादित होणारे विविध उत्पादनांचे मॉडेल

जातात. सुकलेल्या कांद्याचे तुकडे गोण्यांमध्ये बंद करून गोदामात पाठविले जातात. कांदा निर्जलीकरण प्रकल्पातील कांद्याची करून पावडर निर्यात होते. या प्रकल्पासाठी दररोज ४०० ते ४५० टन कांदा लागतो.

पुढचा टप्पा फळांपासून रस तयार करण्याचा. आंबा, टोमॅटो, केळी, पेरु, डाळिंब, टोमॅटो, आवळा, पपई, स्टॉबेरी, जांभूळ या फळांवर प्रक्रिया करून रस तयार केला जातो. त्यात मोठा हिस्सा आंबा पल्पचा (रस) असल्याची माहिती गुणवत्ता नियंत्रक मितेश पाटील यांनी दिली. इतर कोणत्याही फळांपेक्षा आंब्याच्या रसाला मागणी अधिक. त्यामुळे येथल्या प्रकल्पात आंब्याला प्राधान्य दिले आहे. हापूस, तोतापुरी, केशर, राजापुरी, निलम या जातीच्या आंब्याचा रस व फोडी तयार केल्या जातात. रस प्रक्रिया पूर्णतः यंत्रांच्या सहाय्याने होते तर, फोडी मानवी हाताळणीद्वारे तयार होतात. मात्र, यातही अनेक ठिकाणी यंत्रांचा वापर होतो. रस व फोडींसाठी दररोज ५० मेट्रीक टन आंबा लागतो. प्रकल्पाची क्षमता तर दर तासाला २५ मेट्रीक टन इतकी प्रचंड आहे. प्रकल्पाच्या गरजे इतका आंबा मिळत नसल्याने अडचण येते. आंब्याचा हंगाम कमी दिवसांचा असल्याने हा प्रकल्प तीन महिने चालतो. आंब्यापासून ५० टक्के रस (प्युरी) मिळते. ४५० ग्रॅमपासून ते १२ क्विंटल २४ किलोग्रॅम एवढ्या मोठ्या पॅकिंगमध्ये प्युरी मिळते. फोडी कॉन्सट्रेडची संपूर्णतः निर्यात होते. आंब्याच्या रसाची गुणवत्ता तपासणी तज्ज्ञांची २० जणांची एक टीम येथे आहे. ते आळीपाळीने आंब्यांचा स्वाद नोंदवितात. रंग, वास आणि चवीची तपासणी हे तज्ज्ञ करतात. येथे तयार होणारा संपूर्ण रस कोकाकोला इंडिया या कंपनीला पुरविला जातो. आता स्थानिक बाजारात या प्रकल्पातला रस 'आमरस' या ब्रँडने येणार आहे. येत्या काळात सिताफळ, संत्री व मोसंबीपासून ज्यूस तयार करण्याची योजना आहे. तयार होणारे उत्पादन शुद्ध असल्याची खात्री येथल्या प्रयोगशाळेत केली जाते. यासाठी सुसज्ज प्रयोगशाळा येथे आहे. याविषयी विशेष माहिती क्वालिटी विभागप्रमुख अविनाश नाईक यांनी दिली.

## गांधी तिर्थाचं दर्शन

जैन हिल्सवर आलात आणि गांधीतिर्थ न पाहता गेलात हे होऊ शकत नाही. २ लाख चौरस फूट परिसरात गांधी रिसर्च फाउंडेशनची वास्तू उभी राहिली आहे. त्यात ८० हजार चौरस फूट जागेत देखणी इमारत उभी राहिली. या परिसरात आल्याबरोबर एका वेगळ्या विश्वात आल्याच भास आपल्याला होतो. निसर्ग सौंदर्याची तर येथे लयलूट आहेच, सोबत गांधीजींचं विचार धनही आहे. गांधीतिर्थाच्या वास्तूत प्रवेश करतांना आधी दर्शन होते ते गांधीजींच्या भव्य पुतळ्याचे. येथील विविध चित्रांच्या माध्यमातून गांधीजींच्या संपूर्ण जीवनचरित्राचा परिचय होतो. गांधीजींचे जीवनकार्य, त्यांचे सत्य, अहिंसेचे विचार सर्वदूर पोहोचावेत या हेतून या तिर्थाची रचना करण्यात आली आहे. हे एक दृक्श्राव्य पद्धतीने माहिती करून देणारे संग्रहालय आहे. गांधीजींच्या संबंधित ८ हजार ११९ ग्रंथ येथे उपलब्ध आहेत. गांधीजींवरील विविध भाषांमधील ८५ चित्रपट/लघूपट आहेत. गांधीजींच्या आवाजातील १५२ भाषणे, ९ हजाराहून अधिक छायाचित्रे इथे संग्रहित करण्यात आली आहेत. येथे दोन ते अडीच तास आपण ऑडिओ सिस्टिम कानाला लावून गांधीयुगात वावरत असतो. खादीच्या कपड्यांच्या दालन ओलांडल्यावर गांधी तिर्थावरचा प्रवास संपतो.

## वाकोद गावाचा विकास

'जैन' उद्योग समुहाचे सर्वेसवा भवरलालजी जैन यांची जन्मभूमी वाकोद हे गाव आहे. यामुळे या गावाशी त्यांची नाळ बालपणापासून जोडलेली आहे. या गावाच्या विकासाचा आराखडाही त्यांनी तयार केला. गावाचा विकास करतांना गावकऱ्यांचा त्यात सहभाग घेतला. गावातील अतिक्रमण काढून रस्ते रुंद करून कॉंक्रिटीकरण केले. वाकोद परिसरात ठिकठिकाणी नाला खोलीकरण केले, चेकडॅम बांधले. त्यामुळे भुमिगत पाण्याच्या पातळीत वाढ झाली. पिण्याच्या पाण्यासाठीची गावकऱ्यांची वणवण थांबली. गावातील शाळेत विविध सुविधा पुरविल्या. 'कांताई' संस्कार केंद्राच्या माध्यमातून एमपीएससी, युपीएससी, पोलीस भर्तीबाबत मार्गदर्शन केले जाते. राहुरी विद्यापिठांतर्गत कृषि पदविका महाविद्यालय आता वाकोदमध्ये सुरू करण्यात आले आहे.



सिमेंट रस्त्याच्या अवतीभवती दाट झाडी लावली आहेत.

RNI NO. MAHMAR43951/13/1/2014-TC, Postal.JAL/342/2014-2016.

# पांढ-या सोन्याचं भरघोस उत्पादन घ्यायचं! तर... शेतात जैन ठिबकच बसवायचं!!



**जैन ठिबकमुळे** उत्पादनात २३० टक्क्यांपर्यंत वाढ होते.
**जैन ठिबकमुळे** कापुस वेचणीस लवकर सुरुवात होते.
**जैन ठिबकमुळे** पाणी वापरामध्ये ५० ते ६० टक्के बचत होते.
**जैन ठिबकमुळे** विद्राव्य खतांचा कार्यक्षम वापर करता येतो.
**जैन ठिबकमुळे** मजुर खर्च व वेळेची बचत होते.
**जैन ठिबकमुळे** रात्री किंवा लोडशेडींग असतांना देखील कमी वेळेत, अधिक क्षेत्रात पिकास एकसमान पाणी देता येते.
**जैन ठिबकमुळे** जमिनीत कायम वाफसा राहत असल्याने पात्या, फुले, बोंडाची गळ होत नाही, बोंडे चांगली पोसली जातात.

**जैन ठिबक भारतामध्ये ५५,००,००० एकरपेक्षा अधिक क्षेत्रावर कार्यरत.**



जैन टर्बो एक्सल प्लस


जैन टर्बो लाइन व
जैन टर्बो लाइन पीसी


पॉलीट्युब



जैन टर्बो स्लिम - TE


जैन सोलर पंप


जैन पाईप


जैन न्युट्रीकेयर
फर्टिगेशन यंत्रणा


फिल्टर यंत्रणा


ॲटोमॅटीक स्क्रीन
फिल्टर्स

**शेतक-यांसाठी वर्ष २०१५/१६ करीता ठिबक सिंचनाचे अनुदान उपलब्ध आहे. अनुदानाचा लाभ घेण्यासाठी शेतक-यांनी थेट कृषि विभागाशी संपर्क करावा !**

**जैन ठिबक - हवं तेव्हा, हवं तिथच, हवं तितकच पाणी**
**जैन ठिबकची हीच कहाणी!**
उत्तम कामगिरी, अचूक कार्यक्षमता, दर्जेदार गुणवत्ता, भरवशाची, अनुभवसिध्द व शेतक-यांच्या खिशास परवडणारी कार्यप्रणाली - जैन टर्बो एक्सेल, जैन टर्बो ॲक्युरा, जैन टर्बोलाईन, जैन टर्बोलाईन सुपर, क्लास १ व क्लास २ ह्या प्रकारात आणि जैन टर्बो स्लिम - ६, ८, १०, १२, १५, १८, २० मील ह्या प्रकारात शेतक-यांसाठी माफक दरात उपलब्ध.

जैन इरिगेशन सिस्टीम्स् लि.
कल्पना कणभरी, प्रयत्नांचा मेरू करी.®
जैन ठिबक
फोन: ०२५७-२२५८०११;
ई-मेल jisl@jains.com;
वेबसाईट: www.jains.com

जैन पाईप | जैन पीई पाईप | जैन स्प्रिंकलर | जैन टिश्युकल्चर | जैन ग्रीन हाऊस | जैन सोलर पंप | B-SURE | NUTRI CARE | IRRI CARE | SmartClean | NAANDANJAIN

संपर्क : जळगांव - ०२५७-२२२००७७/ ७८, ९४०३०८०१७८, ९४२२७७४९१८; यावल : ९४२२७७४९१४; मुक्ताईनगर : ९४२२७७४९०३; जामनेर : ९४२२७७६७९३; रावेर : ९४२२७७६७१३; एरंडोल : ९४२२७७६९८७; पाचोरा / भडगांव : ९४०३६९५८४२; चाळीसगाव : ९४२२७७४९२४; चोपडा/शिरपुर : ९४२२७७४९९२; पारोळा/ अमळनेर : ९४०३०८०११२; नंदुरबार : ९४०३७७०६२१; शहादा : ९४२२२८३४०९; धुळे : ९४२२७७५९२२; साक्री : ९४०३०८०१८२; शिंदखेडा : ९४०३६९५८४१; नागपूर : ०७१२-२७३४४३१, ९४२२२८३४०८, ९४०३०८०१७१, ९४२२७७६६५७; वर्धा: ९४२२७७४९२७/८२७५३३९९०२; आर्वी: ८२७५३३९९०१; हिंगणघाट : ९४२२४६३२२५; काटोल : ९४०३०८०१८६; गडचिरोली/चंद्रपुर : ९४२२७७६८१६; भंडारा-गोंदीया : ९४२२७७४९४८; अमरावती : ०७२१-२६७४७३७, ९४०३६९५८५६, ९४०३०८०१४२; मोर्शी : ९४२२७७४९०९; अचलपूर/परतवाडा: ९४२२७७६६७६; अकोला: ९४०३०८०१३२, ९४२२७७१००३,९४०३६९५८४४,९४०३५६९५८३७; अकोट : ९४०३०८०१३३, ९४२२७७६७९२; वाशिम : ९४२२७७४९२८, ९४०३०८०१३७. यवतमाळ : ९४२२७७५९०९, ९४०३६९५८७१; वणी : ९४२२७७६७९४; उंबरखेड: ९४२२७७६८५०; दारव्हा : ९४२२७७६८२०; पुसद : ९४२२७७६८५०; बुलढाणा : ०७२६२-२४४८०१, ९४२२२८३४२४; चिखली : ९४०३०८०१८३; खामगांव : ९४०३०८०१८१; मेहकर: ९४०३०८०१७९;औरंगाबाद : ०२४०-२३४५१३६/३७ ९४२२७७४९१२, ९४२२७७६८२९; कन्नड : ९४०३०८०१०६; वैजापूर : ९४०३०८०१३६; सिल्लोड : ९४०३७७०६०६; पैठण : ९४०४८३०२२५; जालना : ९४२२७७५९१२/९५६१०९६४२४; जाफराबाद : ९४०५४४४७१३; परतूर : ९४०३०८०१८९; उस्मानाबाद :९४२२७७६८२७, ९४२२७७६८३४; भुम : ९४०३६९५८०८; बीड : ०२४४२-२२५१३६,९४२२७७६८२७,९४२२७७६८३०, परळी : ९४०३७३१२२५, माजलगाव : ९४०३६९५८०७; आंबेजोगाई: ९४०३०८०११८; लातूर : ०२३८२-२४१०९८, ९४२२७७३३८९, ९४०४५२०२२५; मुरुड : ९४२२७८६१८०; अहमदपूर : ९०९६३५७७८७; औसा : ९४२३११०२९६; उदगीर : ९४२३११०२६४; नांदेड : ०२४६२-२७४०४६. ९४०३०८०१०९, ९४२२७७४९१९, परभणी : ९४०३०८०१२७; हिंगोली : ९४०३६९५८६४; वसमत: ९४२२७७६८३१; देग्लूर: ९४२२७७५९४९; हादगाव: ९४०३७७०६४२; धर्माबाद : ९४२२७७४९२६.

आजच आपल्या जवळच्या जैन ठिबक विक्रेत्याशी संपर्क साधा: